माणिकडोह बिबट निवारा केंद्र, जुन्नर येथे वन्यप्राण्यांच्या पिजऱ्यांच्या वाढीव बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी ०१.१९/ प्र.क्र.२४/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १० एप्रिल, २०१९.

वाचा :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-२४/वअ/लेखा/प्र.मं./प्र.क्र. ७१/९९९/२०१८-१९ नागपूर, दिनांक १०.०१.२०१९.

प्रस्तावना :-

जुन्नर वनविभागातील जुन्नर वनपरिक्षेत्रात बिबट वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीत सातत्याने प्रवेश होऊन व्यक्ती व पाळीव पशुधन यांचेवरील हल्ल्यांच्या घटना घडत असतात. मानव वन्यजीव संघर्ष व मानव वन्यजीव सहअस्तित्व या प्रक्रियेमध्ये काही वन्यजीव अपघातग्रस्त, आजारी अथवा वन्यजीवांची अनाथ पिल्ले आढळतात. त्यावेळी अशा वन्यजीवांना तात्पुरता आसरा उपलब्ध होणे, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करणे, आहार व्यवस्था पाहणे, पुढील निरीक्षणासाठी अशा वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यापुर्वी वन्यजीवांच्या शरिरात सुक्ष्म चिप बसविणे, वन्यजीवांचा अभ्यास करणे इत्यादी कार्य करण्याकरिता माणिकडोह येथे ४ हेक्टर क्षेत्रात बिबट निवारा केंद्राची निर्मिती करण्यांत आलेली आहे. निवारा केंद्रा अंतर्गत बिबट वन्यप्राण्यांचे पिंजऱ्यांच्या वाढीव बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जुन्नर वनविभागातील माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे वन्यप्राण्यांच्या पिजऱ्यांच्या वाढीव बांधकामाच्या रुपये ५६,५२,५००/- लक्षच्या अंदाजपत्रकास खालील अटीस अधीन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने प्रशासकीय मान्यता (वित्तीय मान्यता वगळून) देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

आ) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय कमांक :- इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां. क्र. १, दिनांक १० जोनवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

इ) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च महसूल व वन विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून कराण्यात यावा.

२. सदरचा आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५ मे, २००९, वित्तीय अधिनियम नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तिय अधिकार, अ.क्र.१ परिच्छेद क्र.१३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक :- ९८/इमा-३, दिनांक २९.०३.२०१९ ला अनुलक्षून, निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१०१५२२२९३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: CN = Swapnil Deshbhratar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue and Forest Department
Date: 2019.04.10 15:31:12 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
४. वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
५. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), जुन्नर वन विभाग, जुन्नर.
६. महालोखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
७. कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११. कार्यासन फ-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ (निवडनस्ती).